# औरंगाबाद महानगरपालिका,औरंगाबाद

फोन क्र. (0240)- 2333536-40, फॅक्स क्र. (0240)- 2331213

जा.क्र./मनपा/कनिवसं/1275/2015 दिनांक : 09/11/2015

16

प्रति,
श्रीमती. निर्मला राजाराम कुलकर्णी
प्लॉट क्रमांक 65,66,67 शिवनेरी कॉलनी,
गारखेडा परिसर, औरंगाबाद.

**विषय :** मालमत्ता कर आकारणी दुरूस्ती बाबत.
**संदर्भ :** 1.आपला विनंती अर्ज दि.30/10/2015
2.दि.30/10/2015 रोजी 50% रक्कम भरणा केलेली पावती.
3. सुनावणी दि.07/11/2015

उपरोक्त विषयांकीत प्रकरणी संदर्भ (1) अन्वये आपण दाखल केलेल्या आक्षेप अर्जावर समक्ष सुनावणी घेण्यात आली. सुनावणीमध्ये आपण संदर्भ (2) अन्वये 50% रक्कमेचा भरणा करून आपल्या मालमत्तेस कर आकारणी क्रंमाक.4159/2001-02 तसेच कर आकारणी क्रंमाक 201/2003-04 अशा दोन वेळा कर आकारणी झाल्याचे निर्दशनास आणले आहे. तसेच कराचे देयक आपणास वेळेवर मिळाले असते तर कर भरणा करण्यामध्ये कसुर झाला नसता. देयक क्रंमाक .40230 मध्ये दर्शविलेली विलंबशुल्क कमी करण्याबाबत विनंती केली . सुनावणीसाठी वार्ड अधिकारी (ई) हजर होते.

उपरोक्त सुनावणीनुसार खालील प्रमाणे आदेश पारित करणेत येत आहे.

**आदेश**

1. संबधिताने सादर केलेला अर्ज अशंत: मंजुर करण्यात येतो.
2. संबधिताने एकाच मालमत्तेवर दोन वेळा कर आकारणी करणेत आली आहे. पैकी कर आकारणी क्रं.201/2003-2004 रद्द करण्यात येते.
3. संबधिताना प्रशासनातर्फे मालमत्ता कराचे देयक वेळोवळी न दिल्यामुळे व प्रशासनाकडे तसा पुरावा नसल्यामुळे मागणी बिलातील रक्कम रू.15,492/- विलंब शुल्क क्षमापित करण्यात येते.
4. उर्वरीत कराचा भरणा संबधितानी मागणी बिल क्र.40230 दि.06.04.2015 मालमत्ता क.E0004232 कर योग्य मुल्य रू.8662 नुसार 10 दिवसाचे आत करावा, बेबाकी प्रमाणपत्र घ्यावे.

[redacted]

कर निर्धारक व संकलक
महानगरपालिका,औरंगाबाद.

**प्रत :**

1. विशेष कक्ष, कर आकारणी विभाग महानगरपालिका यांना योग्य त्या कार्यवाहीस्तव देण्यात येत आहे.
2. संगणक विभाग.
3. वार्ड अधिकारी (ई) यांना कार्यवाहीस्तव देणेत येते.

Desktop/Letter2015/Tax Letter

# औरंगाबाद महानगरपालिका,औरंगाबाद

फोन क्र. (०२४०)- २३३३५३६-४०, फॅक्स क्र. (०२४०)- २३३१२१३

जा.क्र./मनपा/कनिवसं/ ५१७ /२०१५ दिनांक २६ /११/२०१५

प्रति,
श्री. डॉ.मारुती भुंजगराव लिंगायत व इतर
वृदांवन कॉलनी, प्लॉट न.-१
वृंदावन सह. गृ.नि, संस्था पुष्पनगरी
औरंगाबाद.

विषय : मालमत्ता करात सुधारणा करणे बाबत.
संदर्भ : १.आपला विनंती अर्ज दि.१४/०९/२०१५
२.सुनावणी दि ३०/१०/२०१५
३.कर आकारणी क्र.६९५/२०१५-१६ (संगणक क्र.D000५०५३)

उपरोक्त संदर्भीय विषयांकीत प्रकरणी कळविण्यात येते की, संदर्भ क्र.(१) चे विनंती अर्जानुसार दि ३०/१०/२०१५ रोजी सुनावणी ठेवण्यात आली. आपण व वार्ड अधिकारी हे समक्ष हजर होते.
संदर्भ क्र.(३) नुसार केलेल्या कर आकारणी मध्ये निवासी कर योग्य मुल्य रु. १०,२५०/- व व्यावसायीक कर योग्य मुल्य रु. १,०५,७७६ एवढे दि. ०१/०४/२०१४ पासुन आकारण्यात आलेले होते.

सुनावणी अंती खालील प्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

निर्णय

१. तळ मजल्यास दि.०१/०४/२०१४ पासुन व्यावसायीक दराने कर आकारणी करावी.
२. पहिला मजला व दुसरा मजला व्यावसायीक वापर नसल्याने निवासी दराने कर आकारणी करावी.
३. भविष्यात संबधित मिळकत धारकानें पहिला मजला व दसरा मजल्याचा व्यावसायीक वापर सुरु केल्यास सात दिवसाचे आत महानगरपालिकेस लेखी कळविणे बंधन कारक राहील. अन्यथा दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल.
४. सुधारीत आदेश निर्गमित झाल्यानंतर सात दिवसात कराचा भरणा करणे मालमत्ता धारकास बंधन कारक राहील.

कर निर्धारक व संकलक
महानगरपालिका,औरंगाबाद

प्रत :
१. वार्ड अधिकारी (ड) यांना देवुन सुचित करण्यात येते की, वरील आदेशा प्रमाणे अंमलबजावणी करुन संबधिताना सुधारीत मागणी बिल देवुन वसुली करावी.
२. आदेश संचिका.

Desktop/Letter2015/Tax Letter

# औरंगाबाद महानगरपालिका,औरंगाबाद

फोन क्र. (0240)- 2333536-40, फॅक्स क्र. (0240)- 2331213


जा.क्र./मनपा/कनिवसं/६८०/2015 दिनांक : 26 /11/2015

प्रति,

1.श्री.गयास खान अब्बास खान

2.श्री.अशफाक खान अब्बास खान

कर भरणा करणार

A.T.C.मोटर्स मॅनेजर

गट क्र.1/2, मिटमिटा,औरंगाबाद.

विषय : मालमत्ता करा बाबत

संदर्भ : 1.आपला आक्षेप दि. 26.03.2015

2.आक्षेपावर सुनावणी दि. 26.11.2015

उपरोक्त विषयांकीत प्रकरणी आपण सादर केलेल्या आक्षेप अर्जावर दि.26.11.2015 रोजी समक्ष सुनावणी घेण्यात आली. सुनावणीस संबंधित अर्जदारातर्फे श्री खालेद सैफोद्दिन हे व वार्ड अधिकारी श्री. चव्हाण हे हजर होते.

संबंधिताने कथन केले की, त्यांचे बांधकाम 2013 मध्ये पुर्ण झाले. विभागातर्फे लावण्यात आलेल्या कर योग्य आहे, तो कायम करावा. तसेच त्यांचा अमल दि.01.10.2013 पासुन द्यावा. प्रकरणी तपास व चौकशी केली असता एल.बी.टी. विभागातर्फे दिलेल्या प्रमाणपत्र अ.क्र.2679 नुसार संबंधिताचा व्यावसाय दि.22.01.2013 पासुन सुरू झाला व त्यांचा नोंदणी क्रमांक 110330182 दि.16.11.2013 रोजी दिलेला आहे. सबब प्रकरणात सुनावणी अंती खालील प्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**आदेश**

1. ए.टी.सी. मोटर्स यांचा दि.26.03.2015 रोजीचा अर्ज अशंत: मान्य करण्यात येतो,
2. संबंधिताची कर आकारणी एल.बी.टी. प्रमाणपत्रानुसार दि.22.01.2013 पासुन अंतिम करण्याचे मान्य करण्यात येते.
3. संबंधितांनी 7 दिवसाचे आत कराचा भरणा करून वार्ड कार्यालयातुन बेबाकी प्रमाण पत्र घेणे.

26/11/15

कर निर्धारक व संकलक

महानगरपालिका,औरंगाबाद

प्रत :

वार्ड अधिकारी (वार्ड-अ) यांना देवुन आदेशित करण्यात येते की, वरील आदेशा नुसार अभिलेखामध्ये आवश्यक ती दुरूस्ती विशेष कक्ष कर आकारणी विभाग येथे करून घेवुन संबंधितास सुधारीत मागणी बिल देवुन सात दिवसात कराची वसुली करावी, तसेच अनुपालन अहवाल सादर करावा.

Desktop/Letter2015/Tax Letter